# महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली

# खनिकर्म विभाग

# वाळु लिलाव सन 2016-17

# (लिलाव सुचना)

**जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली**
जाहीर सुचना-वाळु लिलाव 2016-2017
**रेती/वाळू लिलावाकरिता ई-निविदा व ई-ऑक्शन सूचना**
------------------------------------------------------

**1.** महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन(विकास व विनियमन) नियम,2013 मधील नियम 70 व सन, महसूल व वन विभाग निर्णय क्र.गौखनि 10/0512/प्र.क्र.300/ख, दिनांक 12 मार्च,2013, व निर्णय क्र.गौखनि-10/05123/प्र.क्र.300/ख. दि.19.10.2013, व निर्णय क्र.गौखनि-10/1014/प्र.क्र.498/ख, दिनांक 23.12.2014, आणि शासन निर्णय क्र.गौखनि-10/0815/प्र.क्र.448/ख, दिनांक 16.10.2015, केंद्र शासनाचे पर्यावरण,वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय यांची अधिसुचना दिनांक 15.01.2016 व 20.01.2016, मधील तरतुदी नुसार दरवर्षी जिल्हयातील शासकीय रेती गटांची निर्गती लिलावाद्वारे करावयाची आहे.

**2.** त्यानुसार, जिल्हास्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधीकरण (DEIAA) व जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन समिती (DEAC) यांच्या अनुमतीच्या अधिन राहुन , तसेच संबंधीत ग्रामसभेच्या ना हरकतीस अधिनराहुन एकुण 16 वाळू घाटांचे पहिले व दुसरे लिलाव या पूर्वी करण्यात आला आहे. आता त्यामधुन **शिल्लक असलेल्या 12 वाळू घाटांचा तीसऱ्या फेरीचा व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी फेरसर्वेक्षण करुन लिलावास योग्य दर्शविलेल्या 20 तसेच हिंगोली व परभणी जिल्हयातील संयुक्त असलेल्या 7 अशा एकुण 39 वाळु घाटांचा लिलाव** ई निविदा व ई ऑक्शनद्वारे लिलाव करण्यात येत आहेत. वाळू लिलावाच्या अटी/शर्ती, वाळू गटाची हातची किंमत व ईतर सर्व माहिती गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली, जिल्हयातील सर्व तहसिलदार/उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात तसेच https://maharashtra.etenders.in व आणि www.hingoli.nic.in या वेबसाईट/संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

**3.** ई-निविदा(e-tendering) व ई लिलाव(e-auction) प्रक्रियेत भाग घेणा-यांना वैध डिजिटल सिग्नेचर आवश्यक राहील. नव्याने डिजिटल सिग्नेचर मिळविण्याकरिता पॅनकार्ड, वाहन परवाना, पासपोर्ट साईजचा फोटो यांच्या हार्ड कॉपीज सक्षम प्रमाणीकरण प्राधिकरणास (Certifying Authority) सादर करुन डिजिटल सिग्नेचर मिळविता येईल.

**4.** वाळु लिलावाची प्रक्रिया ही ई-निविदा(e-tendering) व ई ऑक्शन(e-auction) या दोन्ही प्रक्रियांद्वारे राबविली जाईल. ई-निविदा(e-tendering) मध्ये पात्र ठरलेल्या निवीदाधारकालाच ई ऑक्शन(e-auction) मध्ये भाग घेता येईल. ई-निविदा (e-tendering) प्रक्रीयेत भाग घेत असताना संबंधिताने https://maharashtra.etenders.in या वेबसाईटवर ई-निविदा खरेदी करावी. ई-निविदा खरेदी करण्यासाठी 1. वैध ई-मेल आयडी, 2. वैध मोबाईल नंबर, 3. पॅनकार्ड, 4. टीन नंबर (सर्टिफिकेट), 5.करारपत्र/प्रतिज्ञा पत्र 100 च्या बॅंडवर प्रत्येक वाळु घाटाकरीता स्वतंत्र, 6. मागील वर्षाचे आयकर भरल्याचे विवरणपत्र, 7. रहिवाशी पुरावा, 8. कंपनी/फर्म असल्यास रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, इत्यादि कागद पत्रे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे. वरील 1 ते 8 पैकी कोणतेही कागदपत्र अपुर्ण असल्यास निवीदा अस्विकृत करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच ई-निविदा भरत असताना अर्ज फी Debit Card/Credit Card/Net Banking या माध्यमातुन व अनामत रक्कम Debit Card/Credit Card/Net Banking/NEFT/RTGS या माध्यमातुनच जिल्हा खनिकर्म अधिकारी , हिंगोली यांचे खात्यावर जमा करणे आवश्यक आहे.

**5.** ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10,00,000/-(अक्षरी रुपये दहा लाख) व त्यापेक्षा जास्त असेल अशा वाळू गटासाठी अर्ज फी रु.5,000/-(रुपये पाच हजार फक्त) ऑनलाईन भरावी लागेल. ज्या वाळू गटासाठी हातची किंमत रुपये 10,00,000/- (अक्षरी रुपये दहा लाख) पेक्षा कमी असेल अश्या वाळू गटासाठी अर्ज फी रुपये 2,000/-(रुपये दोन हजार फक्त) ऑनलाईन भरावी लागेल.

**6.** लिलावासाठी प्रसिध्द केलेल्या वाळूगटाच्या हातच्या किंमतीवर भरावयाची अनामत रक्कम निश्चित केली आहे व ती प्रसिध्द केलेली आहे. अनामत रक्कम Debit Card/Credit Card/Net Banking/ NEFT/RTGS या माध्यमातुनच जिल्हा खनिकर्म अधिकारी, हिंगोली यांचे ICICI बँक खात्यावर जमा करणे आवश्यक आहे.

**7.** ई-निविदा (e-tendring) च्या बोलीच्या कालावधीत संबंधितास त्यांची बोली अपलोड करता येईल. हा कालावधी संपल्यानंतर दिलेल्या मुदतीत Bid Submission Service Provider fee रु.1063/- Debit Card/Credit Card/ Net Banking द्वारे Nextenders India Pvt.Ltd. यांचे खात्यामध्ये जमा करावी व Online Bid Submission Stage पूर्ण केल्यानंतरच त्यांची ई-निविदा (e-tendering) जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत सादर होईल.

**8.** ई-निविदा (e-tendring) च्या प्रक्रीयेमध्ये टेक्नीकल बीड ओपनिंग (Technical Bid Opening) चा दिनांक व वेळ नमुद केलेली आहे. Technical Bid उघडल्यानंतर नियोजित वेळापत्रकानुसार ई-ऑक्शन (e-auction) प्रक्रिया सुरु होईल. ज्यांना ई-ऑक्शनमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांना http://e-auctions.in या Website वर जाऊन ऑनलाईन बोली टाकता येईल. त्यापुर्वी त्यांना Service Provider fee रु.1000/- Debit Card/ Credit Card/Net Banking द्वारे भरणा करावी लागेल.

**9.** टेक्नीकल बीड ओपनींग(Technical Bid Opening) नंतर ज्या व्यक्तीची कागदपत्रे परिपूर्ण असतील तेच ई-निविदाधारक पुढील प्रक्रियेसाठी पात्र राहतील. <u>जे ई-निविदाधारक टेक्लीकल बीड ओपनींगमध्ये पात्र राहतील अशाच ई-निविदाधारकांना ई-ऑक्शन(e-auction) मध्ये भाग घेता येईल. टेक्लीकल बीड ओपनींगमध्ये अपात्र होणाऱ्या ई-निविदाधारक पुढील लिलाव प्रक्रियेकरीता अपात्र होतील.</u> ई-ऑक्शननंतर दिनांक व वेळ नमुद केल्याप्रमाणे प्राईस बीड ओपन(Price Beed Open) करण्यात येईल.

**10.** ज्यांना एकापेक्षा जास्त गटासाठी ई-निविदा व ई-ऑक्शनमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी प्रत्येक गटनिहाय स्वतंत्रपणे अर्ज फी व अनामत रक्कम, Service Provider fee जमा करणे आवश्यक राहील. या रक्कमा स्वतंत्रपणे वर नमुद केलेल्या पध्दतीने जमा कराव्यात. एकत्रित रक्कम जमा करु नये. तसेच प्रत्येक गटासाठी आवश्यक कागदपत्रे स्वतंत्रपणे अपलोड करावीत.

**11.** तसेच ज्यांना एकाच वाळू गटासाठी ई-निविदा तसेच ई-ऑक्शन या दोन्ही प्रक्रियांमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांना त्याच वाळू गटासाठी ई-टेंडरींग नंतर ई-ऑक्शनसाठी अनामत व अर्ज फी पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही. परंतु, त्यांना Service Provider fee गटनिहाय रक्कम रुपये 1000/- Debit Card/Credit Card/Net Banking द्वारेच Nextenders India Pvt.Ltd. यांचे खात्यामध्ये लॉग इन करताना जमा करावी लागेल.

**12.** ई-ऑक्शनसाठी किमान बोली ही रेती घाटाच्या हातच्या किंमतीच्या अधिक रक्कमेसाठी संबंधितास लावावी लागेल. प्रथम बोलीकरिता 45 मिनिटांचा अवधी देण्यात येईल. दिलेल्या 45 मिनिटांपैकी शेवटच्या 10 मिनिटात कोणी बोली वाढविल्यास लिलावधारकास Auto Extention पध्दतीने 15 मिनिटांचा अवधी वाढून मिळेल. वाढीव 15 मिनिटांपैकी शेवटच्या 05 मिनिटात कोणी बोली लावल्यास Auto Extention System नुसार लिलावधारकास आणखी 15 मिनिटांचा अवधी मिळून सदरची प्रक्रिया अविरत (continue) सुरु राहील. सुरुवातीच्या 45 मिनिटात तसेच वाढीव 15 मिनिटांच्या अवधीत कोणतीही बोली प्राप्त न झाल्यास E Auction System Block होईल. त्यानंतर E Tender उघडून सर्वोच्च बोलीधारक निश्चित करण्यात येईल.

**13.** ई-ऑक्शनमध्ये किमान रुपये 10,000/- व त्याच्या पटीतच बोली लावता येईल. संगणकीय प्रणालीमध्ये एक बॉक्स दिसेल त्यामध्ये 1 ते 100 आकडे असतील. तेथे संबंधीत आकड्याच्या दहा पटीने बोली वाढविता येईल. उदा.20 आकडा निवडल्यास रुपये 2,00,000/- ची बोली लावता येईल. ई-ऑक्शन प्रक्रिया थांबविल्यानंतर/सपंल्यानंतर दुस-या दिवशी सदर वाळुघाट ई-ऑक्शनमधील सर्वोच्च किंमत जाहीर केली जाईल.

**14.** वाळू लिलावासंबंधीचा तारीखनिहाय तपशिल https://maharashtra.etenders.in व http://e-auctions.in आणि www.hingoli.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**15.** सर्वोच्च ई-निविदा व ई-लिलावधारकाने विहित मुद्रांक शुल्क, सुरक्षा ठेव, पर्यावरण शुल्क, आयकर शुल्क, लिलाव रक्कमेच्या 10% व्हॅट रक्कम(VAT) सर्वेक्षण शुल्क तसेच 27 मार्च 2015 रोजी अधिसूचीत झालेल्या खाण व खनिजे (विकास व नियमन) संशोधित अधिनियम-2015 नुसार सर्वोच्च बोलीच्या 10 % रक्कम ना परतावा जिल्हा खनिज प्रतिष्ठान हिंगोली, या नावाने राष्ट्रीयकृत बैकेचा डि.डि. जमा करणे बंधनकारक असुन तदनंतरच  करारनामा व आदेश करण्यात येईल.

**16.** ई-निविदा व ई-लिलावधारकास गौण खनिजाबाबत शासन निर्णय, दिनांक 12.3.2013 व दिनांक 26.12.2014 मधील सर्व तरतुदी, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,2013 तसेच पर्यावरण विषयक अनुमतीमध्ये नमुद व त्यानंतर वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

**17.** ई निविदा/ई ऑक्शनच्या तांत्रीक बाबीसाठी support.gom@nextenders.com या ई-मेल आयडी व दुरध्वनी क्रमांक 020-2531555 वर संपर्क करावा. तसेच कार्यालयीन बाबीविषयी जिल्हा खनिकर्म अधिकारी श्री.अमोल कळसकर यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या 02456-221450 वर व अवल कारकून श्री.एस.के.कोकरे मोबाईल क्र.- 9922023191 तसेच लिपीक, श्री.शेख ए.क्यु. यांच्याशी मोबाईल क्र.- 7385452717 या क्रमांकावर  संपर्क साधावा.

**18.** ई निविदा व ई ऑक्शन पध्दतीने रेती/वाळू लिलाव करणेसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चीत करण्यात आले आहे.

**19.** ई-निविदा(e-tendering) अथवा ई-ऑक्शन(e-auction) स्विकारण्याचे वा नाकारण्याचे तसेच तांत्रिक अडथळा निर्माण झाल्यास सदर कार्यवाही पुढे ठेवण्यासंबंधीचे तसेच कोणत्याही स्तरावर पुर्व सुचना न देता निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी राखून ठेवले आहेत.

**स्वा/-**

**जिल्हाधिकारी, हिंगोली**

**E-Tender and E-Auction Schedule for Hingoli Collector Office**

| Sr.No. | Department Stage | Start Date | Time | End Date | Time |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Tender Release | 01.12.2016 | 10.00 | 03.12.2016 | 23.00 |
| 2 | Tender Download | 03.12.2016 | 23.01 | 13.12.2016 | 23.00 |
| 3 | Bid Preparation | 03.12.2016 | 23.01 | 13.12.2016 | 23.00 |
| 4 | Close for Technical | 13.12.2016 | 23.01 | 14.12.2016 | 23.00 |
| 5 | Close for Price Bid | 13.12.2016 | 23.01 | 14.12.2016 | 23.00 |
| 6 | Bid Submission | 14.12.2016 | 23.01 | 16.12.2016 | 10.00 |
| 7 | Technical Bid Opening | 16.12.2016 | 10.01 | 21.12.2016 | 10.00 |
| 8 | e-Auction | 20.12.2016 | 11.00 | Till process complete | |
| 9 | Price Bid Opening | 21.12.2016 | 10.00 | Till process complete | |

# <u>हिंगोली जिल्हयातील वाळु लिलाव सन 2016-2017 अटी व शर्ती</u>

1.- ई-निवीदा व ई-ऑक्शनमध्ये भाग घेणा-यास संबंधीत कंपनीकडून डिजीटल सिग्नेचर प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

2- Digital Signature मान्यताप्राप्त संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी, त्यासाठी पॅनकार्ड, वाहन परवाना, मोबाईल नंबर, इलेक्शन कार्ड किंवा बँकेचे फोटो असलेले पासबुक तसेच रहिवासी पूराव्यासाठी लाईट बील, टेलीफोन बील इत्यादी साक्षांकीत कागदपत्रे आवश्यक आहेत.

3.-ई-निवीदा/ई-ऑक्शनमध्ये भाग घेणा-यांनी अर्जासोबत आयकर विभागाचे पॅन कार्ड, विक्रीकर विभागाचे टिन प्रमाणपत्र, मागील वर्षी दाखल केलेल्या आयकर रीटर्नची प्रत, फर्म किंवा कंपनी असल्यास रजिष्ट्रेशनची प्रत, रहिवासी पूरावा इत्यादी साक्षांकीत कागदपत्रे स्कॅन करुन जोडणे/अपलोड करणे आवश्यक आहे. ज्या व्यक्ती सदरची कागदपत्रे जोडणार नाहीत त्यांना ई-निवीदा अथवा ई-ऑक्शनमध्ये भाग घेण्याकरीता अवैध ठरविण्यात येईल.

4.-ई-निवीदा व ई-ऑक्शनमध्ये भाग घेऊ इच्छिणा-या व्यक्तींना ज्या वाळूगटाची हातची किंमत रुपये 10,00,000/-(रुपये दहा लाख) पेक्षा जास्त असेल अशा वाळू गटांसाठी अर्ज फी रुपये 5,000/- (रुपये पाच हजार) तसेच ज्या वाळूगटाची हातची किंमत रुपये 10,00,000/- (रुपये दहा लाख) पेक्षा कमी असेल अशा वाळू गटासाठी अर्ज फी रुपये 2,000/- (रुपये दोन हजार) ऑनलाईन भरावी लागेल.

5- ई-टेंडर/ई-ऑक्शनमध्ये भाग घेऊ इच्छिणा-याने संबंधीत कंपनीस ई-निवीदेसाठी रुपये <u>1063/-</u> (रुपये एक हजार तरेसष्ट फक्त) व ई-ऑक्शनसाठी रु <u>1000</u>/- (रुपये एक हजार) असे नापरतावा शुल्क ई-पमेंटद्वारे, जसे ई नेट बँकींग/डेबीट कार्ड पध्दतीने भरणा करुन संबंधित वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन खरेदी करावी लागेल.

6- प्रत्येक व्यक्ती/संस्था यांना प्रत्येक वाळुगटासाठी स्वतंत्र पणे ऑनलाईन चार्जेसचा भरणा करावा लागेल.

7- ई-निवीदा/ई-ऑक्शनद्वारे लिलावात भाग घेणा-या व्यक्तीला, ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10,00,000/- पेक्षा कमी असेल त्या वाळू गटाकरिता हातच्या किंमतीच्या 20% व ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10,00,000/- पेक्षा जास्त असेल त्या वाळू गटाकरिता रुपये 3,00,000/- किंवा हातच्या किंमतीच्या 20% रक्कम यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अनामत रक्कम [EMD] म्हणुन नेट बँकींगद्वारे District Mining Officer Hingoli यांचे ICICI बँक खात्याध्ये उपरोक्त नमुद पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन जमा करावी लागेल.

8- प्रस्तावीत वाळूगटाच्या लिलावासंदर्भात अन्य काही तक्रारी/आक्षेप/सुचना प्राप्त झाल्यास त्याची तपासणी/चौकशी केल्यानंतर व लिलाव न करण्याची सबळ कारणे असल्याची जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांची खात्री झाल्यास लिलावाची प्रक्रीया स्थगीत करण्यात येईल.

9- ई-निवीदा सुचनेमध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार ई-निवीदा/ई-ऑक्शन/फॉर्म खरेदी/डाऊनलोड/बिड भरणे/बिड समाविष्ट करणे/अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रक्रीया विहित वेळेत पुर्ण करणे अत्यावश्यक आहे यांची नोद घ्यावी.

10- वाळु गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या ऑफसेट प्राईस( हातची किंमत) पेक्षा अधिक रकमेची ई-निवीदा/ई-ऑक्शन ऑनलाईन दाखल करणे आवश्यक आहे.

11- ज्या बोलीदारांची निविदा स्विकारण्यात येणार नाही त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर ऑन लाईन पध्दतीने "ई" निविदा भरतांना दिलेल्या बँक खात्यामध्ये परस्पर ऑनलाईन (Online) जमा केली जाईल.

12- संबंधीत रेती/वाळू स्थळात अपेक्षीत वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, वाळुगटात पाणी आहे किंवा नाही, याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी लिलावात भाग घेणा-याची राहील. याबाबत कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

13- ई निवीदा/ई ऑक्शनमधील संबंधीत वाळुगटाची सर्वोच्च किंमत स्विकारल्यानंतर त्यापैकी 1/4 (25%) रक्कम शासन खात्यामध्ये त्याच दिवशी जमा करावी लागेल.

14- सर्वोच्च किंमतीपैकी उर्वरीत 3/4 (75%) रक्कम 15 दिवसांत संबंधीत तहसिलदार यांच्याकडे एक रकमी भरावी लागेल. सदरची रक्कम जमा करण्याच्या हमीचे दायीत्व स्वीकारणा-या दोन व्यक्तीसह लिलावधारकास स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये 100/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅंप पेपर) कागदावर शपथपत्र त्वरित करुन दयावे लागेल. असे शपथपत्र करुन न दिल्यास त्याने भरलली अनामत रक्कम व 1/4 (25%) रक्कम जप्त

करण्यात येईल व संबंधीत वाळुगटाचा फेर लिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे शपथपत्र दाखल न केल्याच्या परिणामी निवीदा/ लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

15- लिलावधारकाने लिलावाची उर्वरीत रक्कम 15 दिवसात न भरल्यास त्याला संपुर्ण राज्यासाठी काळया यादीत टाकुन कोणत्याही जिल्हयात लिलावात भाग घेण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल.

16-आयकर अधिनियमातील तरतूदीनुसार लिलावातील सर्वोच्च किंमतीच्या अनुषंगाने टीडीएस देणे लिलावधारकास बंधनकारक राहील. तसेच त्यांना विक्रीकर खात्याकडे नियमानुसार विक्रीकर शासन जमा करणे बंधनकारक राहील.

17- लिलावधारकास रुपये 5000/- (रुपये पाच हजार) इतक्या रकमेचा उपसंचालक महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, औरंगाबाद यांच्या नावे काढण्यात आलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी,डी,) सर्वेक्षण शुल्कापोटी जमा करावा लागेल तसेच 27 मार्च 2015 रोजी अधिसूचीत झालेल्या खाण व खनिजे (विकास व नियमन) संशोधित अधिनियम-2015 नुसार स्वामीत्वधाच्या 10 % रक्कम ना परतावा जिल्हा खनिज प्रतिष्ठान हिंगोली, या नावाने  रक्कम जमा करावा लागेल.

18-लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रुपये 3,00,000/- (रुपये तीन लाख फक्त) किंवा हातच्या किंमतीच्या 20% यापैकी जी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. परंतु, ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये 10,00,000-/ (रुपये दहा लाख फक्त) पेक्षा कमी असेल त्या वाळू गटासाठी हातच्या किंमतीच्या 20% रक्कम अनामत म्हणुन भरावी लागेल. ही रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशतः अथवा पुर्णतः जप्त करण्यात येईल.

19- लिलावधारकास पर्यावरण शुल्कापोटी, सर्वोच्च किंमतीच्या 2% रक्कम ही बँक गॅरंटीच्या स्वरुपात पर्यावरण शुल्क म्हणून दयावी लागेल. त्याने लिलावातील अटी/शर्तीचा भंग केल्यास सदरची रक्कम जप्त करुन त्यांचेवर नियमानुसार गुन्हा दाखल करण्यात येईल.

20- ज्यावेळी लिलाव रद्द करण्यात येईल, त्यावेळी त्या वाळू क्षेत्राचा नव्याने लिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास, फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

21- लिलाव मंजुरीचे आदेश निर्गमित केल्यानंतर लिलावधारकाने वाळुगटाचा ताबा सात दिवसांच्या आत घेतला पाहीजे व वाळुगटाचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत उत्खनन सुरु करणे आवश्यक राहील.

22- मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.4830/2010 मधील दिनांक 26.10.2010 च्या निर्णयान्वये ठरवून दिलेल्या निकषानुसार, वाळू गटाशी संबंधित तहसिलदार यांनी उत्खननाचा अहवाल प्रत्येक आठवड्याला जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. तसेच महिण्याच्या दुस–या व चौथ्या रविवारी उत्खननबंद ठेवावे. व उत्खनन बंद असलेल्या दिवशी तहसिलदार यांनी वाळू गटाचे निरीक्षण करावे व त्यांचा अहवाल जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. सबब, लिलावधारकांनी सदर बाबीची नोंद घ्यावी.

23-लिलावधारकास, त्यांच्या मंजुर क्षेत्रातील ज्या ठिकाणातून वाळू काढण्याने जमिनीची धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारा जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतीम असेल.

24- भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाने विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमीनीतून, अशा जमिनी लिलावधारकास देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी त्या ठिकाणाहून वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते पायवाट म्हणुन वापरण्यात येणा-या जमीनीतून वाळू काढता येणार नाही.

25- कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फुट) अंतराच्या आत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी नाल्यांवर पूल आहेत,त्यांच्या स्तंभापासून 100 मीटर्सपर्यंत रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व पुरातत्व खात्याने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रामध्ये रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

26- वाळूचे उत्खनन करतांना किंवा ती काढतांना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायीत्व लिलावधारकावर राहील. अशा हानी/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसुलाच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

27- लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजुर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

28- उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी केला असेल त्याच जिल्ह्यात करावी लागेल व त्यासाठी अकृषिक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. सदर वाळू साठविण्यासाठी एकच सलग जागा ठरविता येईल. ते ठिकाण नदीपात्रापासून 200 मीटरपेक्षा अधिक अंतरावर नसावे. सदरच्या क्षेत्रात नदीपात्रातून जाण्यासाठी एकच आणि नदीक्षेत्रातून बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल आणि उर्वरित सर्व क्षेत्र अशाप्रकारे बंद करावे लागेल की ज्यामुळे तेथे एकही वाहन आत किंवा बाहेर जाऊ शकणार नाही. यासाठी लाकडी/तारेचे/लोखंडी/ भिंतीचे/दगडाचे कुंपण किंवा मोठमोठी दगडे जी हलविता येणे अशक्य आहे ती ठेवणे किंवा खंदके/चर खोदणे आवश्यक असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळू/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळू/रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू रेती साठा करण्यास परवाना दिला जाणार नाही.

29-लिलावधारकाने निर्धारित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करुन प्रत्येक वाहनामधील वाळूचे परिमाण, वाहन क्रमांक, वाळूगटाचे नाव/क्रमांक, वाहन कोठून कोठे जाणार आहे, त्या दोन ठिकाणांमधील अंतर इत्यादि तपशिल नोंदणीकृत मोबाईलवरुन एसएमएस (SMS) निर्दिष्ट क्रमांकावर कळविल. प्रणालीकडून लिलावधारकास नोंदणीकृत मोबाईलवर त्याने केलेल्या विनंतीनुसार त्यास एसएमएसद्वारे टोकन नंबर प्राप्त होईल.सदर टोकन नंबर बारकोड पावतीवर नमुद करावा लागेल. टोकन नंबर प्राप्त झाल्याशिवाय व ते बारकोड पावतीवर नमुद केल्याशिवाय लिलावधारकास वाळू/रेतीची वाहतूक करता येणार नाही. टोकन नंबरशिवाय व बारकोड पावती शिवाय वाहूतक केल्यास ती अवैध ठरुन त्यावर प्रचलित कायदे व धोरणानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

30-वाळू/रेतीची वाहतूक करणा-या चालकाकडे उक्त टोकन नंबर नसेल किंवा टोकन नंबरचा कालावधी संपलेला असेल तर अशी वाहतूक अवैध ठरेल.

31- वाळू/रेतीची वाहतूक करणा-या वाहन चालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती व टोकन नंबर आहे किंवा नाही, याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडून नियुक्त भरारी पथकाकडून,तहसिलदार, जिल्ह खनिकर्म अधिकारी अथवा जिल्हाधिकारी नामनिर्देश करतील अशा व्यक्तींकडून केली जाईल. अशा निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त पावती व वैध टोकन नंबर आढळली नाही किंवा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,1966 मधील कलम 48(7) व (8), महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, 2013 आणि शासन निर्णय, दिनांक 12.3.2013 मधील निर्धारित तरतुदीनुसार त्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

33- वाळू/रेती लिलावधारकाने पावतीमध्ये नमुद परिमाणापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौण खनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती बाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे लिलाव धारकाने दर महिन्याच्या 05 तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, खनिकर्म विभाग व संबंधीत तहसिलदार यांच्या कडे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी अवल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच अपर जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरिक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

34- अंदाजीत परिमाणापेक्षा अधिक वाळुसाठा रेतीगटात असल्यास, त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही. व अंदाजीत परीमाणापेक्षा लिलावधारकास अधिक उत्खनन करता येणार नाही. परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तर नमुद अंदाजीत वाळुसाठयापैकी वाळु कमी भरल्यास त्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

35- लिलावधारकाने जिल्हा परिषद कर/पंचायत कर विहित केल्याप्रमाणे अदा करावा

36- जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चीत करुन दर्शविण्यात यावी. लिलावधारकाने त्याला मंजुर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे. स्वत:चे तसेच सक्षम प्राधीका-यांच्या पुर्व परवानगीने नेमलेल्या त्याच्या उपठेकेदाराचे नाव, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणरा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

37- लिलावात मंजूर केलेल्या वाळूघाटातून वाळु उत्खननाची अंतीम मुदत जिल्हाधिकारी हे निश्चीत करुन देतील अथवा 30 सप्टेंबर 2017 पर्यंत राहील. लिलाव घेण्याची तारीख कोणतीही असली तरी लिलावाचा कालावधी जिल्हाधिकारी हे निश्चीत करुन देतील त्या दिवशी अथवा 30 सप्टेंबर 2017 रोजी संपुष्टात येईल. लिलावात दिलेल्या क्षेत्रातून करारात नमुद केलल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहायानेच वाळूचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षीत साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळु स्थळात पाणी आहे, अशा तसेच मानवी वा नैसर्गीक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परीस्थीतीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलून दिला जाणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत शासन जमा केलेली वाळूगटाची रक्कम परत केली जाणार नाही.

38- उत्खनन केलेल्या गौण खनिजाचे वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. वाहतुकीसाठी वेगळे रस्ते शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच आवश्यकता असल्यास वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत वाळु उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा वाळुगट बदलुन दिला जाणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत शासन जमा केलेली वाळूगटाची रक्कम परत केली जाणार नाही. वाहतूकीसाठी खाजगी जमीनीतून रस्ता मिळविण्याची जबाबदारी ही लिलावधारकाची राहील.

39- वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केलेले असेल त्या क्षेत्रातून वाळु उत्खनन करतांना नैसर्गीक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

40- पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी निकामी वाळूचे साचलेले ढिग नदीपात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. त्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

41- लिलावधारकाने सिलटेशन (Siltation) अभ्यासाबाबतचा अहवाल वाळू उत्खननाचा कालावधी संपण्यापूर्वी तज्ञ एजन्सी, जसे NIO/CWPRS मार्फत करुन त्याचा अहवाल पर्यावरण विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे सादर करावा लागेल.

42- लिलावधारकाने मंजूर क्षेत्रापैकी कमीत कमी 20 टक्के क्षेत्रामध्ये नदीतीरावर तसेच गावातील वाहतूक रस्त्यावर CPCB Guideline नुसार स्थानीक वन अधिकारी व फलोत्पादन अधिकारी यांचे मदतीने झाडे लावून हरीयाली (Greenbelt) करावी लागेल.

43- लिलावधारकाने कासव प्रजनन क्षेत्रात वाळुचे उत्खनन करु नये.

44- लिलावधारकाने उत्खननाच्या वेळी Soil Erosion व Silt Management बाबत आवश्यक त्या दक्षता घेण्यात याव्यात.

45- लिलावधारकाने उत्खननाच्या जागेवर वैद्यकीय प्राथमीक उपचार सुविधा उपलब्ध करुन दयावी.

46- लिलावधारकाने वार्षिक पर्यावरणीय अंकेक्षण अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा.

47-लिलावधारकाने वाळूचे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने सर्वेक्षणात विहित केलेल्या खोलीपेक्षा जास्त खोलीत उत्खनन करु नये. तसेच नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी घ्यावी. तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाने दिलेल्या प्रमाणपत्रातील नकाशाप्रमाणे दर्शविलेल्या हद्दीतूनच वाळूचे उत्खनन करणे बंधनकारक राहील. दिलेल्या हद्दीबाहेर उत्खनन केल्यास ते अवैध उत्खनन समजून नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

48-लिलावधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कास बाधा पोहचविता कामा नये.

49-वाळू उत्खनन करतांना अथवा हलवितांना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलील ठाण्यात तसेच तहसिल व जिल्हाधिकारी कार्यालयास दयावी.

50-लिलावधारकांनी त्यांना मंजूर केलेल्या वाळुगटातून केलेल्या वाळूचे उत्खनन, विक्री व साठा केल्याबाबत दैनंदिन हिशोब ठेवावा. तसेच दर महिन्याच्या 05 तारखेपर्यंत, अगोदरच्या महिन्याचा मासिक अहवाल, जिल्हाधिकारी कार्यालय, खनिकर्म विभाग व तहसिल कार्यालय यांना सादर करावा सलग दोन महिने असा अहवाल प्राप्त न झाल्यास अथवा सादर केलेल्या अहवाल चुकीचा आढळुन आल्यास सदरच्या वाळु घाटाचा लिलाव रद्द करुन शासनची दिशाभुल केल्यामुळे योग्य ती नियमानुसार कार्यवाही अनुसरली जाईल.

51-लिलावधारकाने लिलावाच्या अटी व शर्ती तसेच केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण विभागाकडील दिनांक 24.12.2013 मधील ऑफीस मेमोरँडम तसेच महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 व वाळू निर्गती धोरण, शासन निर्णय दिनांक 12.03.2013, दिनांक 26.12.2014 तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतुदीनुसार लागू असलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याच प्रमाणे वाळुचा पुर्ण उपयोग गौणखनिज म्हणूनच केला पाहिजे. अवैध वाळु उत्खनन/साठा/वाहतुक प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 मधील 48(7) व (8) नुसार तसेच प्रचलीत कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

52-वाळुचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने जिल्हाधिकारी, हिंगोली यांना तात्काळ कळविले पाहीजे.

53- सार्वजनिक पाणवठा/पाणीपुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्राणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.

54- वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादीत करुनच वाळूची वाहतुक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतुक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

55- लिलावधारकाने वाळु उत्खनन करतांना होणारे प्रदुषणासंबंधी, प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी.

56- मा.न्यायालयाने कोणत्याही वाळुघाटाबाबत काही आदेश/निर्णय दिल्यास,सदर आदेश/निर्णय लिलावधारकावर बंधनकारक राहतील व मा. न्यायालयाचे आदेश/निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

57- लिलावधारकाने वाळू उत्खनन करण्यासाठी परवानगी दिलेल्या यांत्रीक साधनांचा वापर करुनच वाळुचे उत्खनन करणे बंधनकारक राहील. विनापरवानगी यांत्रीक साधनांचा वापर केल्यास ते उत्खनन अवैध समजण्यात येईल व अटी व शर्तीनुसार कारवाई करण्यात येईल.

58- वाळू उत्खननासाठी सक्शन पंपाचा वापर अनुज्ञेय नाही. तथापि, सार्वजनीक हितार्थ अपवादात्मक परिस्थितीत वाळुघाटातून वाळूचे उत्खनन करण्याकरीता सक्शन पंपाचा वापर करावयाचा असल्यास, पर्यावरण विभाग, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे संमतीपत्र/नाहरकत प्रमाणपत्र सादर करुन त्यास शासन महसूल व वन विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबंधीतास अटी व शर्तीच्या अधीन राहून, नियमानुसार सक्शन पंपाची परवानगी देण्यात येईल. तसेच सक्शन पंप हे विना परवानगी वापरता येणार नाहीत. सक्शन पंपाचे वापरासाठी शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर लिलावधारकाने सक्शन पंपाच्या क्षमतेबाबत तसेच इतर माहिती सादर करुन जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन सक्शनपंप वापराकरीता रितसर परवानगी घेणे बंधनकारक आहे.

59-शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय लिलावधारकास ठेका दुस-या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुस-या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा निविदा उघडुन मंजूर केल्यानंतर भागीदारही घेता येणार नाही.

60- वाळुचे उत्खनन केवळ सकाळी 06.00 ते सायंकाळी 06.00 या कालावधीतच करता येईल. या कालावधीनंतर केलेले उत्खनन अवैध समजुन कारवाई करण्यात येईल.

61-(अ) शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार लिलाव करण्यात आलेल्या वाळुघाटाबाबत कालांतराने लिलावाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन होते. अवैध व नियमबाहय वाळु उत्खननामुळे नदीकाठच्या गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्यावर विपरीत परीणाम होतो. वाळूच्या वाहतुकीमुळे नदीकाठच्या शेतीच्या रस्त्यांची हानी होते. अशा स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थांकडून करण्यात येतात. अशा तक्रारीची दखल घेऊन त्या संदर्भात चौकशी करुन चौकशीच्या निष्कर्षानुसार कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील अधिका-यांचा समावेश असलेली समिती राहील

| | | |
|---|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| 2 | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद | - सदस्य |
| 3 | सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता | - सदस्य |
| 4 | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे जिल्हयातील किंवा यथास्थिती विभागातील वरीष्ठ अधिकारी | - सदस्य |
| 5 | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा अधिकारी | - सदस्य |
| 6 | जिल्हा खनिकर्म अधिकारी, हिंगोली | - सदस्य सचीव |

(ब) लिलावात घेतलेल्या वाळू गटातुन लिलाव धारकास उत्खनन करण्यास विरोध झाल्यास किंवा नैसर्गीक किंवा लिलावधारकाच्या नियंत्रणाबाहेरील सबळ कारणामुळे उत्खनन होऊ शकले नाही तर लिलावधारकाने जिल्हास्तरीय समितीसमोर तक्रार अर्ज करुन ती बाब निदर्शनास आणावी. जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांनी याबद्दल चौकशी करुन त्याबद्दलची वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आणुन देतील.

(क) जिल्हयातील एखाद्या वाळुगट संदर्भात वरील स्वरुपाच्या लेखी तक्रारी प्राप्त झाल्यास उपरोक्त समिती अशा वाळूगटांना प्रत्यक्ष भेट देऊन त्या वाळू गटाचे पुन:श्च सर्वेक्षण करेल. तसेच तक्रारीतील अन्य मुदयांबाबत स्थानिक चौकशी करील व समितीच्या बैठकीत त्यावर विचार विनिमय करुन त्याबाबतच्या निष्कर्षाचा अहवाल अध्यक्षांना सादर करेल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यांनतर संबंधीत वाळू गटातून वाळूचे उत्खनन चालु ठेवण्याविषयी किंवा ते बंद करण्याबाबत अध्यक्ष 10 दिवसांत उचित निर्णय घेतील व तो निर्णस संबंधीत लिलावधारक, तक्रारदार व क्षेत्रीय महसूल अधिकारी यांना कळविल.

(ड) - ज्या तक्रारदारास समितीच्या अध्यक्षांचा निर्णय मान्य नसेल अशा तक्रारदाराला याबाबत मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे अपील करता येईल. ते समितीचा अहवाल व अध्यक्षांचा निर्णय याचा फेरविचार करुन कोणत्याही परीस्थितीत 10 दिवसांत निर्णय घेतील. सदर निर्णय संबंधीत तक्रारदार व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल. मा.विभागीय आयुक्त यांनी घेतलेला निर्णय मान्य नसल्यास शासनाकडे अपील करता येईल.

62-नदीपात्रातील काही वाळू गटांचा लिलाव करण्यास व्यापक विरोध झाल्यास अशा वाळू स्थळांच्या संदर्भात अंतीम निर्णय घेण्यासाठी महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनी-10/0610/प्र.क्र.281/ख, दिनांक 26.05.2011 अन्वये गठीत केलेली मंत्री मंडळाची उपसमिती निर्णय घेईल.

63-अवैध उत्खनन/वाहतुकीची प्रकरणे उघडकीस आल्यास अशा प्रकरणी संबंधीत ठेकेदार/लिलावधारक/ वाहनमालक-वाहनचालक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल. प्रचलित नियमानुसार कारवाई करतांना संबंधीतांविरुध्द भारतीय दंड विधी संहिता कलम 379 प्रमाणे गुन्हा दाखल करणे, वाहन जप्त करणे, दंडात्मक कारवाई करणे, फौजदारी स्वरुपाची कारवाई करणे इत्यादी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल.

64-लिलावधारकाने त्यांना मंजूर केलेल्या क्षेत्रामधील/क्षेत्रालगतच्या वन्य प्राण्यांचे/पक्षांचे अस्तीत्वास तसेच त्यांच्या निवासास इजा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.

65-लिलावधारकाने वाळु उत्खनन करतांना मा.सर्वोच्च न्यायालय तसेच नॅशनल ग्रीन ट्रीब्युनल यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.

66- लिलावधारकाने नदीचा प्रवाह,गती,गढूळता यांच्या स्वरुपात बदल होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच वाळुचे उत्खनन करतांना नदीतील मातीच्या गुणधर्मांवर परीणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

67-वाळु वाहतुक करणारी वाहने रहिवासी भागात उभी करु नयेत.

68-लिलावधारकाने कामगारांसाठी निवासाची सोय, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुवीधा उपलब्ध करुन दिली पाहीजे.

69-वाळुची वाहतुक करणा-या वाहनांचे सक्षम प्राधीकरणाने दिलेले Pollution Under Controll प्रमाणपत्र वाहनासोबत बाळगणे आवश्यक आहे.

70-लिलावधारकाने वाळु उत्खनन करीत असतांना पाण्याचा उपसा करणे आवश्यक असल्यास त्यासाठी संबंधीत विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

71-लिलावधारकाने वाळु उत्खननामुळे खराब झालेल्या पाण्यावर Moef/ MPCB च्या तरतुदीनुसार प्रक्रीया करावी.

72- लिलावधारकाने मंजुर क्षेत्रातील Ambient Air Quality Monitoring माहे जानेवारी, एप्रिल, नोव्हेंबर, महिन्यात करावी.

73- लिलावधारकाने CPCB च्या नियमानुसार Noise Level Controling करावे.

74-लिलावधारकाने त्यांच्या मंजूर संपुर्ण क्षेत्रावर प्रकाश पडेल अशा रितीने लाईटची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच संपुर्ण क्षेत्र दिसेल अशा पध्दतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवुन सदर कॅमे-याचे फुटेज मासीक अहवाला सोबत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

75- लिलावधारकाने वन्यजीव आवास क्षेत्रासंबंधीच्या नियमांचे उल्लंघन करु नये.

76- लिलावधारकाने त्यांना मंजुर क्षेत्रात जाण्या येण्यासाठी एकच मार्ग/रस्ता ठेऊन इतर सर्व मार्ग/छोटे रस्ते इ. बॅरीकेडसने बंद करावेत.

77- लिलावधारकाने त्यांच्या लिलाव क्षेत्रात येणा-या प्रत्येक वाहनांची नोंदणी संबंधीत तहसिलदार यांचेकडे करावी.

78- वाळुचे अनाधिकृत उत्खनन व वाहतुक टाळणेसाठी जिल्हा प्रशासनामार्फत वेळोवेळी देण्यात येणारे निर्देशाचे पालन लिलावधारकास करणे बंधनकारक राहील.

79- दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार

घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

80- शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

81- "ई" निविदा, "ई" ऑक्शनमध्ये भाग घेणा-या सर्व व्यक्ती/संस्थेस महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभागाकडील सर्व अटी/शर्ती बंधनकारक राहतील.

82- लिलाव धारकाने त्याच्या लिलाव क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक वाहनाची नोंदणी संबंधीत तहसिलदार यांच्याकडे करुन या कार्यालयाने निर्गमित केलेले स्टीकर्स प्रत्येक वाहनाला लावणे आवश्यक आहे.

83- सदरचे लिलाव पर्यावरण समितीच्या अंतीम मंजुरीच्या अधिन राहुन करण्यात येत आहे.

84- शासनाने दिनांक 16.10.2015 च्या परिपत्रकान्वये कळविल्यानुसार ज्यांना वाळु लिलाव मंजुर होईल त्यांचेकडुन लिलावाची सर्व रक्कम शासन जमा केल्यापासुन तिन दिवसांत लिलाव धारकाच्या नावे पर्यावरण अनुमती वर्गकरण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. उपरोक्त् एकुण 39 वाळु/रेती जिल्हास्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधीकरण (DEIAA) व जिल्हास्तरीय तज्ञ मुल्यांकन समिती (DEAC) यांच्या अनुमतीच्या व संबंधीत ग्रामसभेच्या नाहरकरीतच्या अधिन राहुन लिलाव घेण्यात येत आहे. सदर 39 वाळु/रेती घाटां पैकी कोणतेही घाटाच्या लिलावा सदर समितीने रद्द केल्यास अथवा ग्रामसभेची नाहरकत न मिळाल्यास संबंधीत वाळु घाटाचा लिलाव रद्द करण्यात येईल या बाबत लिलाव धारकाचा कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही, किंवा त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रारीचा हक्क राहणार नाही तसेच त्यांनी भरणा केलेले निवीदा शुल्क, तसेच सिफी कंपनीचे सेवा शुल्क हि नापरतावा असल्याने ते निवीदा धारकास परत केले जाणार नाही.

85- वाळुचे अनाधिकृत उत्खनन व वाहतुक टाळण्यासाठी केंद्र शासन /राज्य शासन / जिल्हा प्रशासनामार्फत वेळोवेळी देण्यात येणारे निर्देशांचे पालन लिलावधारकास करणे बंधनकारक राहील.

86- पावत्यांचा गैरवापर टाळण्यासाठी तसेच वाळुच्या अवैध साठवणुकीला आळा घालण्यासाठी लिलाव धारक यांना संबंधीत लिलावाची मुदत संपन्याच्या शेवटच्या 15 दिवसात पावती पुस्तक दिले जाणार नाही. या मुळे आवश्यक असलेल्या पावत्यांची मागणी त्या पुर्वीच करुन ते घेण्यात यावीत.

87- लिलाव धारकास त्यांच्या नावाने लिलाव अंतीम झाल्यास 100 रु. च्या स्टॅंप पेपर वर वाळु लिलावाबाबतच्या अटी व शर्ती पालन करणे बाबत करारनामा/शपथपत्र देणे बंधनकारक राहील.

88- ई-निवीदा/ई-ऑक्शन मधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे, ई-निवीदा/ई-ऑक्शन प्रक्रीयेत वेळेवर निर्णय घेण्याचे तसेच ई-निवीदा/ई-ऑक्शन मधील सर्वोच्च किंमत स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी,हिंगोली यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

## शासन निर्णय दिनांक 23.12.2014 अन्वये निश्चित करण्यात आलेल्या अटी व शर्ती.

१) वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किमंती) पेक्षा अधिक बोलीने " ई " निविदा भरुन लिलावाला सुरुवात करण्यात येईल.

२) " ई " निविदा / " ई " ऑक्शनद्वारे लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा हातच्या किमंतीपेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटाचा १० दिवसाच्या आत फेरलिलाव करण्यात येईल.

३) " ई " निविदा भरु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला २० % अनामत रक्कम ही निविदा भरताना ऑनलाईन (Online) पध्दतीने भरावी लागेल. ज्या बोलीदाराची उच्चत्तम " ई " निविदा " ई " ऑक्शननंतर स्विकारण्यात येईल. ज्या बोलीदारांची निविदा स्विकारण्यात येणार नाहीत त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर ऑन लाईन पध्दतीने " ई " निविदा भरतांना दिलेल्या बँक खात्यामध्ये परस्पर ऑनलाईन (Online) जमा केली जाईल.

४) " ई " निविदा/ " ई " ऑक्शनद्वारे लिलाव घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहिल. त्यानंतर याबद्दल कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

५) " ई " निविदा / " ई " लिलावातील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचा राहील.

६) “ ई ” निविदा / “ ई ” लिलावातील सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतर व १/४ रक्कम भरल्यानंतर “ ई ” निविदेनुसार उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतच्या हमीचे दायीत्व स्वीकारण्याऱ्या दोन व्यक्तीसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये १००/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर त्वरीत करारनामा करुन देईल. असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत रेती/वाळू गटाचा फेरलिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरीलप्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी लिलावधारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रकमेपैकी वरील अ.क्र. ३ प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली ७५% रक्कम सर्वोच्च “ ई ” निविदा / “ई” लिलाव स्विकारल्यापासून १५ दिवसात एक रकमी भरावी लागेल. लिलावधारकाने शिल्लक राहीलेली ७५ % रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्याकडून ताबा देण्याचे आदेश त्वरीत निर्गमित केले जातील. लिलावधारकाने रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्याच्या दिनांकापासून उशीरात उशीरा ७ दिवसाच्या आत तहसिलदार यांच्याकडून लिलावधारकांनी अटी व शर्तीमधील सर्व बाबींची पुर्तता केली असल्याची खात्री केल्यानंतर लिलावधारकास वाळू स्थळाचा ताबा देण्यात येईल.

७) ज्यावेळी रेती/वाळू (ठेका) लिलाव रद्द करण्यात येईल, अशा वेळेस त्या रेती/वाळू क्षेत्राचा नव्याने “ ई ” निविदा/ “ ई ” ऑक्शन पध्दतीने फेरलिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पूर्वीच्या लिलावाच्या किमंतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. तथापि, फेर लिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

८) लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/वाळू काढण्याने जमीनीची धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतीना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचे निर्णय अंतिम असतील.

९) विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातून रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तींच्या खाजगी मालकीच्या जमिनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, रेती/वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते/पायवाटा म्हणून वापरण्यात येणा-या जमिनीतून रेती/वाळू काढता येणार नाही.

१०) जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना खाडी पात्रातील नौकाननयन मार्गातील अडथळे दूर करणे तसेच जल-जीवन व जल संपत्तीच्या हिताचा दृष्टीने खाडी क्षेत्रातील रेती उत्खननासाठी ड्रेझर्सचा वापर करण्यावर उचित बंधने घालता येतील.

११) कोणत्याही रेल्वेच्या पूलाच्या कोणत्याही बाजूने ६०० मिटर्स (२००० फूट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी- नाल्यांवर पूल आहेत, त्यांच्या स्तंभापासून १०० मीटर्स पर्यत रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व पुरातत्व खात्याने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रामध्ये रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

१२) जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन दर्शविणेत यावी.

१३) वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहिल. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्या बाबतचा त्याचा

निर्णय अंतिम राहिल व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकी प्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

१४) लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा रेती/वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. परंतू लिलावाची मुदत संपण्यापुर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किमंतीला लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रककम परत करतांना लिलावाची देकारची रक्कम लिलावातील अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळू साठा विचारात घेवून त्यानुसर परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

१५) उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूची/रेतीची साठवणूक, लिलाव ज्या जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांनी  केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषिक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. सदर वाळू साठविण्यासाठी एकच सलग जागा ठरविता येईल. ते ठिकाण नदीपात्रापासून २०० मीटरपेक्षा अधिक अंतरावर नसावे. सदरच्या क्षेत्रात नदीपात्रातून जाण्यासाठी एकच आणि नदीक्षेत्रातून बाहेर रस्त्यावर पडण्यासाठी एकच मार्ग असेल आणि उर्वरित सर्व क्षेत्र अशाप्रकारे बंद करावे लागेल की ज्यामुळे तेथे एकही वाहन आत किंवा बाहेर जाऊ शकणार नाही. यासाठी लाकडी / तारेचे / लोंखडी / भिंतीचे / दगडाचे कुपंण  किंवा मोठमोठी दगडे जी हलविता येणे अशक्य आहे ती ठेवणे किंवा खंदक / चर खोदणे आवश्यक असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापुर्वी ज्या वाळू /रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळू चा /रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर १० दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळूच्या/रेतीच्या किमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच १० दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/ रेती साठा करण्यास परवाना दिला जाणार नाही.

१६)  लिलावधारकास वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना दयावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था / संस्थाना प्राधान्य दिले पाहीजे.

१७) लिलावधारकाने सर्व प्रकारचे कर इत्यादी विहीत केल्याप्रमाणे अदा करावेत.

१८) लिलावधारकोने त्याला वाटप केलेल्या /मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे.

१९) लिलाव घेण्याची तारीख कोणतीही असली तरी लिलावाचा कालावधी ३० सप्टेबर रोजीच संपुष्टात येईल. लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्याने वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे तसेच मानवी वा नैसर्गिक आपतीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळू गट बदलून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

२०) उत्खनन केलेल्या वाळूच्या/रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील, रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही.अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

२१) नदीपात्रातून/नाल्यातून अथवा त्याला रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

२२) रेतीचे/वाळूचे नदीपात्रातून/नाल्यातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर विहीत केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

२३) लिलावधारकाने गावक-याच्या निस्तार हक्कास बाधा पोहोचविता कामा नये.

२४) रेती/वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

२५) गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबधातील सर्व हिशोब व कागदपत्रे , लिलावाने/परवानाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे आणि सदरहू हिशोब व कागदपत्रे संबधीत महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांच्या निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन दयावीत.

२६) लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रुपये ३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या २० टक्के यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी याच्यांकडे ठेवणे आवश्यक आहे. परंतू ज्या वाळू गटाची हातची किंमत रु. १० लाख पेक्षा कमी असेल तर हातच्या किंमतीच्या २०% रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल हि रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम अंशत: अथवा पुर्णत: जप्त करण्यात येईल.

२७) लिलावधारकाने नियमात नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदीनुसार असलेले नियम (संबधित विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतूदी नुसार तसेच अन्य कायदे / नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

२८) लिलावधारक /परवानाधारक यांना पर्यावरण विषयक व तटीय विनियमन नियमाच्या तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

२९) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे किंवा इतर बंधारे / बांध असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/ विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

३०) सार्वजनिक पाणवठा/पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मिटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे अवश्यक आहे.

३१) वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने/ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

३२) अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळू साठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास मुभा राहणार नाही.

३३) अवैध वाळू /रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील ४८(७) व (८) नुसार तसेच इतर लागू होणा-या सर्व कायदे व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

३४) लिलाव मंजूर करणेत आलेल्या वाळू गटांना वाळू उत्खननाकरिता संक्शनपंपाचा वापर करावा लागेल अशा वाळू गटांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची व शासनाची परवानगी मिळाल्यानंतर रितसर परवानगी देणेत येईल.

३५) "ई" निविदा, "ई" ऑक्शनमध्ये भाग घेणा-या सर्व व्यक्ती /संस्थेस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहतील.

३६) लिलावधारकांने निवीदा अधिसूचना, सर्वसाधारण निर्देश, विशेष निर्देश यातील अटी,शर्ती पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहीत करारनामा करुन घेतल्या नंतर पात्र लिलावधारकास वाळू गटाचा ताबा देण्यात येईल.

३७) दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

३८) शासन वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम तसेच लिलावधारकाने शासनास अदा केलेली सर्व रक्कम जप्त करुन लिलाव रद्द करण्यात येईल आणि इतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्वा/-**

जिल्हाधिकारी, हिंगोली

**रेती घाट ई निविदा/ई ऑक्शन धारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रुपये 100/- चे मुद्रांकित स्टॅम पेपरवर दोन साक्षीदारांसह द्यावयाचे प्रतिज्ञापत्र**

## <u>शपथपत्र</u>

मी, (पूर्ण नाव) ----------------------------------------------------------------------
राहणार(पोस्टाचा पूर्ण पत्ता द्यावा) ---------------------------------------------------------
ता. --------------------------------------- जिल्हा ----------------------------------------
माझे/माझ्या संस्थेचे पॅन क्रमांक------------------ टीन क्रमांक/सी.एस.टी.नं. -----------------
मोबाईल क्रमांक------------------------------------

मी प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, मी मौजे . . . . . . . . . ता. . . . . . . . . येथील वर्ष 2016-17 साठीच्या रेती लिलावाच्या अनुषंगाने स्थानिक वर्तमानपत्रात . . . . . . . . . वेबसाईटवर प्रसिध्द झालेल्या ई निविदेतील सर्व अटी व शर्तीची माहिती करुन घेतली आहे व त्यांचे पालन करण्याची हमी देत आहे व मी निविदेत प्रस्तावित केलेल्या किंमतीत उक्त रेती घाट घेण्यास इच्छूक असून त्याची अनामत (EMD) ची रक्कम रु. .... .. . शासन जमा करीत आहे.

मला सदर रेती घाट मंजूर झाल्यास, लिलावात मंजूर करण्यात आलेल्या रकक्मेच्या 1/4 रक्कम मी लिलावाच्या दिवशी व उर्वरीत 3/4 रक्कम 15 दिवसांच्या आत चालानद्वारे शासन जमा करुन मंजूर रेती घाटाचे निष्पादन करुन घेण्याची हमी देत आहे. सदरची रक्कम मुदतीत भरण्यास मी कसूरदार ठरल्यास मी जमा केलेली EMD ची रक्कम रु. . . . . . शासन जमा करण्यास माझी हरकत नाही.

तसेच नियमानुसार फेर निविदेद्वारे दुस-या निविदा धारकास सदरचा रेती घाट मंजूर केल्यास माझी काही हरकत राहणार नाही. फेर निविदेद्वारे शासनाच्या महसुलाचे काही नुकसान झाल्यास, सदर नुकसानीची भरपाई जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यास मी संमती देत आहे.

फेर निविदेत पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या लिलावाच्या रक्कमेपेक्षा अधिकची रक्कम आल्यास आधीकच्या रक्कमेवर माझा काहीही अधिकार राहणार नाही.

मी असेही घोषित करतो की, सदरहू रेती घाट, रेती साठा आणि रेती घाटास जाणारे पोच/गाव रस्ते इत्यादिची मी पाहणी केली आहे,त्याच्या परिस्थितीबाबत अथवा रेती वाहतुकीच्या योग्यतेबाबत मी भविष्यात कोणताही आक्षेप/वाद उपस्थित करणार नाही.

ठिकाण -----------------
दिनांक ------------------

( )

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

हमीघेणाऱ्याचे

1. पूर्ण नाव ---------------------------------------------- स्वाक्षरी -----------------
   पत्ता --------------------------------------------------------------------------

2. पूर्ण नाव ---------------------------------------------- स्वाक्षरी -----------------
   पत्ता --------------------------------------------------------------------------

# जिल्हास्तरीय तसेच हिंगोली व परभणी जिल्हा संयुक्त वाळु घाट लिलाव सन 2016-2017

| अ.क्र | रेती गटाचे नांव | तालूका | नदीचे नांव | तपशिल वाळू गटास लागून असलेले गट.क्र./सर्व्हे नं | वाळू गटाचे क्षेत्र हे.आर मध्ये | अंदाजीत उपलब्ध वाळू साठा | GSDA यांनी वाळू उत्खन्न साठी दिलेली खोली (मीटर) | निश्चित केलेली शासकिय किंतम ( अपसेट प्राईज ) | ई लिलावा करीता भरावयाची 20% रक्कम | ई निवीदा ईऑक्शन अर्जाचे शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | | | | **तीसरी फेरी असलेले जिल्हास्तरीय वाळु घाट** | | | | | | |
| 1 | दुर्गधामणी | हिंगोली | कयाधु | 221,17,67 | 0.80 | 700 | 0.30 | 896700 | 179340 | 2000 |
| 2 | हिंगणी | हिंगोली | कयाधु | 365,367,368,370,371,314,06,21,14,01,252,251,262 | 0.62 | 1000 | 0.20 | 1281000 | 300000 | 5000 |
| 3 | खेड | हिंगोली | कयाधु | 162,126,127,128,129,130,99,136 | 0.70 | 750 | 0.20 | 960750 | 192150 | 2000 |
| 4 | हिंगोली | हिंगोली | कयाधु | 160 ते165,136,137,157,240,242,243,245,238 | 0.45 | 500 | 0.50 | 640500 | 128100 | 2000 |
| 5 | इडोळी | हिंगोली | कयाधु | 279,496,495,499,402,492,491,460,459,458,457,456,455,454,452,451,450,449,429,428,426,423,422,421,420,408 TO 419,391,380,379,377,376,270 TO 283, 288,291,292,295 to 297. | 1.00 | 500 | 0.50 | 640500 | 128100 | 2000 |
| 6 | चिंचपुरी | हिंगोली | पैनगंगा | 2/1,4,9,5/1,6/1,11,17,14 | 0.50 | 500 | 0.20 | 448500 | 89700 | 2000 |
| 7 | खेर्डा | हिंगोली | पैनगंगा | 87,90,91,211,214 | 0.80 | 500 | 0.50 | 448500 | 89700 | 2000 |
| 8 | काळकोंडी | हिंगोली | कयाधु | 207,208, 197, 195,189 ते 193, 180, 178,177, 171 ते 173, 196, 135 ते 137, 160, 163, 125, 164,169 | 0.50 | 400 | 0.40 | 512400 | 102480 | 2000 |
| 9 | चाफनाथ | कळमनुरी | कयाधु | 56,57,58,59,60,61,66,67 | 0.18 | 1800 | 0.40 | 2494800 | 498960 | 5000 |
| 10 | सालेगाव | कळमनुरी | कयाधु | 186,187,188,189,216,219,220,221, | 0.72 | 1200 | 0.30 | 1663200 | 332640 | 5000 |
| 11 | नांदापुर | कळमनुरी | कयाधु | 476 ,477, 501, 502, 503. | 0.60 | 800 | 0.40 | 1108800 | 300000 | 5000 |
| 12 | अंजनवाडी | औढा ना. | पुर्णा | 6,11,20,10, | 0.50 | 2500 | 0.20 | 13025000 | 2605000 | 5000 |
| | | | | **पहिली फेरी असलेले जिल्हास्तरीय वाळु घाट** | | | | | | |
| 13 | भटसावंगी | हिंगोली | पैनगंगा | 2/1,3/1,3,42/1,70 | 0.50 | 400 | 0.30 | 358800 | 71760 | 2000 |
| 14 | अमला | हिंगोली | कयाधु | 263 to 270, 283,286,291,292,295,296,297,313,314,315,328 to 337. | 0.50 | 600 | 0.50 | 757200 | 151440 | 2000 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15 | सरकळी | हिंगोली | कयाधु | 249,250,251,252,254,255,256,257,258,259,260,261,262,264,265,270,271,48,21,22,23,24,28,33,34,35,37,38,41,42,43,47. | 0.50 | 300 | 0.50 | 384300 | 76860 | 2000 |
| 16 | बरडा पिंप्री | सेनगाव | पुर्णा | 98,153,187,186, | 0.20 | 200 | 0.30 | 358000 | 71600 | 2000 |
| 17 | सापळी | कळमनुरी | कयाधु | 2,3,6,7,8,9,10,11,13,14,15,16 | 0.50 | 700 | 0.40 | 970200 | 194040 | 2000 |
| 18 | कोंढुर | कळमनुरी | कयाधु | 14,126,129,130,131,132,133,134,139,141,142,143,144,145,201,202,205,206, | 0.30 | 700 | 0.30 | 970200 | 194040 | 2000 |
| 19 | सोडेगाव | कळमनुरी | कयाधु | 310,311,371,383,384,391,392,400,404,408,426,440,441, | 0.34 | 1100 | 0.20 | 1524600 | 304920 | 5000 |
| 20 | चिखली | कळमनुरी | कयाधु | 1,2,6,31,32,34,35,37,38,40,41,42,115,116, | 0.35 | 500 | 0.30 | 8687000 | 1737400 | 5000 |
| 21 | सावंगी भू | कळमनुरी | कयाधु | 38,45,56,55,59,62,61,64,71,70,79,80 | 0.60 | 1200 | 0.30 | 1663200 | 332640 | 2000 |
| 22 | डोंगरगाव पुल | कळमनुरी | कयाधु | 16,17,18,20,21,33,34. | 0.50 | 1000 | 0.40 | 17374000 | 3474800 | 5000 |
| 23 | कस्बेधावंडा | कळमनुरी | कयाधु | 48,2,56,57,58,59,69,62,64,65,66,67,68,60/1,55/1,54,53,51,50,49 | 0.60 | 1200 | 0.30 | 15074400 | 3014880 | 5000 |
| 24 | कान्हेगाव | कळमनुरी | कयाधु | 27,31,32,33,34,200,201,202,203 | 0.50 | 700 | 0.50 | 12161800 | 2432360 | 5000 |
| 25 | अनखळी | औंढा ना. | पुर्णा | 347,348,349,355,364,365,366,367,372,376,374,390,396,400, | 0.80 | 1800 | 0.40 | 4518000 | 903600 | 5000 |
| 26 | चिमेगाव | औंढा ना. | पुर्णा | 71,92 | 1.50 | 4200 | 0.30 | 10542000 | 2108400 | 5000 |
| 27 | भगवा | औंढा ना. | पुर्णा | 53,54,55. | 0.80 | 1800 | 0.20 | 4518000 | 903600 | 5000 |
| 28 | नालेगाव | औंढा ना. | पुर्णा | 35,36,95,89,86,87, | 0.80 | 1700 | 0.20 | 2053600 | 410720 | 5000 |
| 29 | पुर | औंढा ना. | पुर्णा | 1,2,3,4,5,222,223,224,225,226,229,230,231,233,234,235,236,237,238,239. | 0.80 | 1200 | 0.30 | 3012000 | 602400 | 5000 |
| 30 | आजरसोंडा | औंढा ना. | पुर्णा | 403404 | 0.60 | 1600 | 0.20 | 1932800 | 386560 | 5000 |
| 31 | दरेगाव | औंढा ना. | पुर्णा | 8,9,11 | 0.50 | 1500 | 0.20 | 6613500 | 1322700 | 5000 |
| 32 | पोटा खु. | औंढा ना. | पुर्णा | 20,37,38,40,46,47, | 0.90 | 2200 | 0.30 | 11462000 | 2292400 | 5000 |
| **हिंगोली व परभणी जिल्हा संयुक्त वाळु घाट पहिली फेरी** | | | | | | | | | | |
| 33 | सावंगी खु | परभणी | पुर्णा | 10, 11, 12, 13, 21, 22, 23, 24, 25, 26, 27 | 0.50 | 883 | 0.50 | 5115623 | 1023125 | 5000 |
| | सावंगी बु | वसमत | पुर्णा | 1,3,360,367,368, | 0.25 | 1780 | 0.50 | | | |
| | | | | | | | | | | |
| 34 | टाकळी बोबडे | परभणी | पुर्णा | 142, 143 | 0.50 | 883 | 0.50 | 71015295 | 14203059 | 5000 |
| | माटेगाव | वसमत | पुर्णा | 2,34,221,222, | 0.30 | 1690 | 0.20 | | | |
| | ढवुळगाव | वसमत | पुर्णा | 3,34,8,9,13,14,15,208,211,212, | 0.60 | 940 | 0.20 | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| 35 | जोडपरळी | परभणी | पुर्णा | 285, 284, 280, 278, 277, 276, 275, 274, 272 | 1.00 | 1767 | 0.50 | 4854367 | 970873 | 5000 |
| | परळी | वसमत | पुर्णा | 342,345,356,358, | 0.25 | 760 | 0.20 | | | |
| | | | | | | | | | | |
| 36 | संबर | परभणी | पुर्णा | 406, 407, 408, 417, 418, 5, 6,7 | 0.38 | 668 | 0.50 | 4548928 | 909786 | 5000 |
| | सोन्नर तर्फे हट्टा | वसमत | पुर्णा | 2,3,45,141,152 | 0.20 | 730 | 0.20 | | | |
| | ब्राम्हणगाव खु | वसमत | पुर्णा | 7,1,8,9 | 0.35 | 970 | 0.20 | | | |
| | | | | | | | | | | |
| 37 | पिंपळगाव टोंग | परभणी | पुर्णा | 13,14 | 0.15 | 318 | 0.50 | 10462896 | 2092379 | 5000 |
| | पिंपळगाव कुटे | वसमत | पुर्णा | 17,5,76,78,339,340,359, | 0.43 | 1490 | 0.40 | | | |
| | | | | | | | | | | |
| 38 | निलज | जिंतुर | पुर्णा | 25, 22, 20, 19, 18, 16 | 1.50 | 5300 | 1.00 | 84912000 | 16982400 | 5000 |
| | ब्रम्हवाडी | सेनगाव | पुर्णा | 143, 141, 135. | 0.6 | 500 | 0.50 | | | |
| | | | | | | | | | | |
| 39 | वझर बु. | जिंतुर | पुर्णा | 481, 480, 476, 475, 470, 469, 468 | 1.25 | 4417 | 1.00 | 10598157 | 2119631 | 5000 |
| | बन | सेनगाव | पुर्णा | 393,372,364,253,142,153,152, | 0.42 | 600 | 0.30 | | | |
| | वझर खु. | सेनगाव | पुर्णा | 173,172,171,166,165,162,161,188,351,157,155,153,129,128,127, | 0.3 | 500 | 0.20 | | | |

**स्वा/-**

**जिल्हाधिकारी हिंगोली**